महाराष्ट्र शासन

आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

सेनापती बापट रोड, बालभारती आवार, पुणे

वेबसाईट : education.maharashtra.gov.in ईमेल : educommoffice@gmail.com

क्रमांक : ईगव्ह./अति.समायोजन/२०१६-१७/ १८७६

दिनांक : ३१ मार्च, २०१७

**परिपत्रक :-**

**विषय - सन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार खाजगी शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील अनुदानित पदावरील अतिरिक्त शिक्षकांच्या ऑनलाईन समायोजनाबाबत..**

संदर्भ -
१. शालेय शिक्षणव क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. १६/क्र.प्र./२०१५-एसएसएन-१५२-टीएनटी/ दि.२८.८.२०१५ व दिनांक ०८.०१.२०१६
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र.एसएसएन-२०१६/ प्र.क्र.४७/१६/टीएनटी-२, दि.०२ ऑगस्ट, २०१६
३. शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/सं.क्र.२३३/१६/टीएनटी-२, दि.२७.१०.१६
४. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक दि.१०.०६.२०१६
५. आयुक्त शिक्षण कार्यालयाचे परिपत्रक क्र. ७०५५, दि.२२.१२.२०१६
६. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७
७. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१
८. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथील याचिका क्र.६६०६/१५ मधील आदेश दि.१७.६.२०१६
९. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील या.क्र.९०७६/१५ मधील दि.३१.८.२०१६ चे आदेश
१०. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथील याचिका क्र.१५६/१६ मधील आदेश दि.११.७.२०१६
११. शा.प.क्र. एसएसएन/२०१६/(प्र.क्र.५६/१६)/टिएनटी २, दि.२७.१०.२०१६ व दि.३१.१२.२०१६
१२. आयुक्त शिक्षण कार्यालयाचे क्रमांक.७९, दिनांक ०५ जानेवारी, २०१७ रोजीचे परिपत्रक
१३. आयुक्त शिक्षण कार्यालयाचे क्रमांक.२६०, दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजीचे परिपत्रक
१४. शासन पत्र क्र.एसएसएन-२०१७/प्र.क्र.३/१७/टीएनटी-२, दि.३० मार्च, २०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाकीत सर्व संदर्भ कृपया अवलोकन करावेत.

केंद्र शासनाच्या बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या शिक्षकांच्या सुधारीत निकषांनुसार इ.१ली ते ८वीच्या स्तरावरील शिक्षक निश्चितीचे निकष विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या दृष्टीने निश्चित केलेले आहेत. तसेच इ.९वी ते

प्रत्येक शाळेत प्रत्येक वयोगटाचे किमान काही विद्यार्थी अपेक्षित आहेत. आदर्श स्थितीत प्रत्येक प्राथमिक शाळेच्या प्रत्येक वर्गात ३० विद्यार्थी तर उच्च प्राथमिक शाळेच्या प्रत्येक वर्गात ३५ विद्यार्थी परिभाषित आहेत. आणि इ.९ वी व १० वीच्या प्रत्येक वर्गात ४० विद्यार्थी अपेक्षित आहेत.

विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे काही शाळांमध्ये शिक्षक अतिरिक्त होत असतात व विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे शिक्षकांची गरज निर्माण होते. सेवानिवृत्ती, राजीनामा इ. कारणामुळे जागा रिक्त होत असतात, अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळांमधून या शिक्षकांचे रिक्त जागा असलेल्या शाळांमध्ये समायोजन करणे क्रमप्राप्त ठरते.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन विद्यार्थी संख्येचे निकष ठरविण्याची बाब विचारात घेऊन विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक संख्या निश्चित करणे व त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची बाब विचारात घेऊन संदर्भ क्र.१ व २ मधील शासन निर्णयानुसार संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करण्यात आलेले आहेत.

या सुधारित संच मान्यता निकषानुसार सन २०१६-१७ ची प्राथमिक शाळा, उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळेची संच मान्यता प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. या संच मान्यतेमध्ये विद्यार्थी पटसंख्येचे निकष अवलंबल्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समावेशनाची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने केल्यास प्रत्येक कर्मचाऱ्यास न्याय मिळतो व संपूर्ण प्रक्रिया पारदर्शी होते.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम,१९७७ मधील कलम ५ नुसार खाजगी शाळांच्या व्यवस्थापनावर विविक्षित आबंधने निश्चित करण्यात आलेली असून संबंधित शाळा व्यवस्थापनाने त्यांच्याकडील मान्य रिक्त पद भरण्यापूर्वी शिक्षणाधिकाऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या यादीतून योग्य व्यक्ती उपलब्ध होण्याजोगी आहे किंवा कसे याची खात्री करुन घेऊन अशी व्यक्ती उपलब्ध असल्यास त्या व्यक्तीच्या रिकाम्या पदावर नेमणुक करण्याचे बंधन संस्थेवर घालण्यात आलेले आहे.

थोडक्यात दरवर्षी विहित निकषांच्या आधारे विद्यार्थी पटावर शाळानिहाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे निश्चित केली जातात. या पदनिश्चितीमध्ये जे कर्मचारी अतिरिक्त म्हणून घोषित केले जातात त्यांचे परिपूर्ण रिक्त पदी समावेशन करणेची जबाबदारी राज्यातील सर्व संस्था, मुख्याध्यापक तसेच शिक्षणाधिकारी यांची आहे.

## <u>समायोजनाची प्रक्रीया खालीलप्रमाणे राहील</u>

१) संच मान्यता निश्चित झाल्यानंतर संस्थानिहाय मंजूर कर्मचाऱ्यांची त्यांच्या संवर्गानुसार जेष्ठतायादी तयार करुन अशी जेष्ठता यादी संबंधित शैक्षणिक संस्थांनी दरवर्षी १ जानेवारी या दिनांकास प्रसिध्द करुन हरकती विचारात घेऊन अंतिम करावी.

यासाठी शिक्षणाधिकारी यांनी शिबिराचे आयोजन करुन संस्थेने अतिरिक्त ठरविलेल्या शिक्षकांना आवश्यकता भासल्यास **म्हणणे** घेऊन मान्यता द्यावी. अशा अतिरिक्त शिक्षकास शिक्षणाधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयावर विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे संदर्भ क्र.५ नुसार निवेदन करण्याची मुभा राहील.

शिक्षणाधिकारी यांनी आयोजित केलेल्या शिबिरात अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषयानिहाय रिक्त जागा यांची माहिती संस्था प्रतिनिधी/ मुख्याध्यापक यांनी सादर करावी.

एखाद्या संस्थेने शिबिराचे वेळी अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषयनिहाय रिक्त जागा इ. माहिती न दिल्यास शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापकांकडून उपलब्ध करुन घ्यावी. (महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र.२२ (१) व परिशिष्ठ **'ज'** नुसार अशी माहिती देणे मुख्याध्यापकावर बंधनकारक आहे.)

अशा प्रकारे अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषयानुसार रिक्त जागा व्यवस्थापनाने घोषित करण्यापूर्वी शाळांतर्गत व संस्थांतर्गत समायोजनाची प्रक्रीया पूर्ण करावी.

वरीलप्रमाणे सर्व कार्यपध्दती पूर्ण करुन शिबिराच्या शेवटी शिक्षणाधिकारी यांनी आपल्या कार्यालयाच्या फलकावर व संकेतस्थळावर अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषयनिहाय रिक्त जागा इ. माहिती प्रदर्शित करावी.

३) शिक्षणाधिकारी यांनी संस्थेकडून अंतिमरित्या घोषित केलेल्या व मान्यता दिलेल्या अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषयनिहाय रिक्त पदांची माहिती शिक्षणाधिकारी यांचे लॉगिनव्दारे edustaff.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर समायोजन पोर्टलवर भरण्याची कार्यवाही करावी.

४) सन २०१५-१६ च्या संच मान्यतेनुसार ज्या अतिरिक्त शिक्षकांचे जिल्हा स्तरावर समायोजन झालेले आहे व असे शिक्षक नवीन शाळेत रुजू झालेले आहेत अशा शिक्षकांची माहिती वगळून इतर सर्व अतिरिक्त शिक्षकांची माहिती त्यांच्या मूळ शाळेतून सन २०१६-१७ च्या समायोजनासाठी अतिरिक्त ठरल्यास समायोजन पोर्टलवर भरण्यात यावी.

५) सन २०१५-१६ च्या संच मान्यतेमध्ये अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-याचे समायोजन अन्य अनुदानित शाळेत झालेले असल्यास व आता २०१६-१७ च्या संच मान्यतेमध्ये पूर्वीच्या संस्थेत/शाळेत पद रिक्त अथवा नव्याने निर्माण झालेले असल्यास महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती), नियमावली १९८१ मधील नियम २६ (५) (६) मधील तरतुदीनुसार यथानियम कार्यवाही करावी. जर असा शिक्षक मूळच्या शाळेत जाण्यास नकार देत असेल तर संबंधित संस्था मूळच्या शाळेत सन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार रिक्त पद म्हणून समायोजन पोर्टलवर त्याची माहिती भरेल.

७) सन २०१५-१६ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांबाबत मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल झाले असल्यास अशा प्रकरणात याचिकादाराची याचना व त्यावरील विभागाची बाजू कोणत्या मुद्यांवर मांडावयाची याचा अभ्यास करुन केवळ प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे म्हणून अशा शाळांमध्ये समायोजनाचा उमेदवार पाठविण्याबाबत नकारात्मक भूमिका ठेवण्यात येऊ नये. कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त कर्मचाऱ्यास समावेशित करीत असताना निव्वळ रिक्त पद व त्या पदावर संबंधिताच्या व्यावसायिक पात्रतेचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल ही भावना विचारात घेऊन समायोजन प्रक्रीया राबवावी.

८) शिक्षण सेवक अतिरिक्त ठरत असल्यास त्यांच्या समायोजनाबाबत शासन निर्णय, दिनांक २७ जून, २०१६ मधील तदतुदीनुसार स्वतंत्रपणे कार्यवाही करावी. समायोजन पोर्टलवर त्यांची माहिती भरु नये.

९) जर एखादा अतिरिक्त होणारा शिक्षक हा ३० जून, २०१७ पर्यंत सेवानिवृत्त होणार असेल तर अशा शाळेतील सदर संवर्गातील शिक्षक अतिरिक्त समजण्यात येऊ नये.

१०) क्राफ्ट, संगीत व तबलजी या विषयाचे शिक्षक सेवाज्येष्ठतेने कनिष्ठतम असल्याने अतिरिक्त होत असले तरी, सदर विषयांच्या जागा रिक्त नसल्याने अशा शिक्षकांना अतिरिक्त ठरवू नये.

११) शासन शुध्दीपत्रक, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ अनुसार अल्पसंख्याक संस्थांमधील अतिरिक्त शिक्षकांचे रिक्त जागा असलेल्या इतर अल्पसंख्याक संस्थेमध्ये त्यांच्या इच्छेनुसार समायोजन करण्यात येईल. त्यासाठी ऑनलाईन माहिती भरताना या संदर्भात अशा संस्थांना विचारणा करण्यात येईल व त्यानुसारच समायोजनाची प्रक्रिया पार पडेल.

**शासन निर्देशानुसार ऑनलाईन समायोजनाचे पुढीलप्रमाणे टप्पे राहतील :**

**टप्पा क्रमांक ०१ :- संस्थेला अतिरिक्त शिक्षक निवडीचा अधिकार -**

१. नियमानुसार नियुक्तीचे अधिकार संस्थांना आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांच्या यादीमधील विषयनिहाय शिक्षक निवडण्याचा प्रथम अधिकार हा संस्थांना राहील. संस्थेला त्या त्या जिल्हयातील संस्थांच्या शाळांमधील पदनिहाय रिक्त पदांनुसार संस्थेचा रोस्टर व अध्यापनाचा विषय विचारात घेऊन त्या जिल्हयाच्या अतिरिक्त शिक्षकांच्या यादीतील शिक्षकाला निवडण्याचा अधिकार राहील. त्यानुसार संस्थेचा अनुशेष व विषयांच्या गरजेनुसार अतिरिक्त शिक्षकांची नावे संस्थेला त्यांच्या लॉगिनला उपलब्ध होतील.

२. संस्थेला अतिरिक्त शिक्षक निवडताना जी संस्था प्रथम प्राधान्याने ऑनलाईन लॉगिन करुन एखाद्या

**टप्पा क्रमांक ०२ :- अतिरिक्त शिक्षकांना त्यांच्या पसंतीने शाळा निवडण्याचा अधिकार -**
वरील टप्पा क्रमांक ०१ मध्ये समावेशन न होणाऱ्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन सेवाज्येष्ठतेने त्यांच्या पसंतीने समुपदेशन पध्दतीने पुढील सहा फेऱ्यांमध्ये करण्यात येईल.

**Round 1 -** (On Same Category and Same Subject No.1 Preferred)
अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या सेवाज्येष्ठता यादीनुसार शिक्षकांचा प्रवर्ग व अध्यापनाचा प्राधान्यक्रमानुसार दिलेला विषय क्रमांक ०१ या दोन्ही बाबींनुसार जिल्हयातील ज्या संस्थेत सदर प्रवर्गासाठी विषयाची जागा रिक्त असल्यास सदर शाळेची यादी उपलब्ध होईल.
**उदा.** सेवाज्येष्ठता यादीनुसार अनु.जाती प्रवर्गातील शिक्षकाला अनु.जाती प्रवर्गात, अनु.जमाती प्रवर्गातील शिक्षकास अनु.जमाती प्रवर्गात, सर्वसाधारण प्रवर्गातील शिक्षकास सर्वसाधारण प्रवर्गात याप्रमाणे शिक्षकाच्या त्या त्या प्रवर्गात अध्यापनाच्या विषय क्रमांक ०१ नुसार समायोजन करण्यात येईल.

**Round 2 -** (Against General Category and same Subject No.1 Preferred)
प्रथम फेरीत (Round-1) मागासवर्ग शिक्षकांचे समायोजन झाल्यानंतर शिल्लक राहिलेले मागासवर्ग शिक्षक व सर्वसाधारण प्रवर्गातील अतिरिक्त शिक्षक या दोन्हींसाठी सेवाज्येष्ठतेने त्यांच्या अध्यापनाच्या प्राधान्यक्रमानुसार दिलेला विषय क्रमांक ०१ नुसार सर्वसाधारण प्रवर्गातील रिक्त पदांच्या जागेवर (Against General Category but same Subject) शिक्षकाच्या विषयानुसार रिक्त जागांची यादी उपलब्ध होईल.
**उदा.** प्रथम फेरीत (Round-1) समायोजन न झालेल्या अतिरिक्त शिक्षकांच्या सेवाज्येठता यादीनुसार सर्व प्रवर्गातील शिक्षकांस सर्वसाधारण प्रवर्गातील रिक्त जागेवर अध्यापनाच्या विषय क्रमांक ०१ नुसार समायोजन करण्यात येईल.

**Round 3 -** (Against any Category and same Subject No.1 Preferred)
ज्या शिक्षकांचे व्दितीय फेरीत (Round-2) समायोजन होऊ शकणार नाही, अशा शिक्षकांना त्यांच्या प्रवर्गाचा विचार न करता त्याच्या त्यांच्या अध्यापनाच्या प्राधान्यक्रमानुसार दिलेला विषय क्रमांक ०१ नुसार रिक्त जागांची यादी उपलब्ध होईल.
**उदा.** व्दितीय फेरीत (Round-2) समायोजन न झालेल्या अतिरिक्त शिक्षकांच्या सेवाज्येठता यादीनुसार प्रवर्गाचा विचार न करता रिक्त जागेवर अध्यापनाच्या विषय क्र.०१ वर तात्पुरते समायोजन करण्यात येईल.

**Round 4 -** (On Same Category and Same Subject No.2 Preferred)
ज्या अतिरिक्त शिक्षकांचे तिसऱ्या फेरीत (Round-3) समायोजन होऊ शकणार अशा शिक्षकांना त्यांच्या

**Round 5** - (Against General Category and Same Subject No.2 Preferred)

ज्या अतिरिक्त शिक्षकांचे चौथ्या फेरीत (Round-4) समायोजन होऊ शकणार अशा शिक्षकांना त्यांच्या अध्यापनाच्या प्राधान्यक्रमानुसार दिलेल्या विषय क्रमांक ०२ नुसार सर्वसाधारण प्रवर्गातील रिक्त जागा उपलब्ध होतील.

**Round 6** - (Against any Category and Same Subject No.2 Preferred)

ज्या अतिरिक्त शिक्षकांचे पाचव्या फेरीत (Round-5) समायोजन होऊ शकणार अशा शिक्षकांना त्यांच्या प्रवर्गाचा विचार न करता अध्यापनाच्या प्राधान्यक्रमानुसार दिलेल्या विषय क्रमांक ०२ नुसार रिक्त जागा उपलब्ध होतील.

ज्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल त्या शिक्षकांना समायोजनाच्या आदेशाची (ऑनलाईन ऑर्डर) प्रिंट काढून त्याच दिवशी स्वाक्षरीत करुन द्यावी. ज्या शिक्षकांचे जिल्हास्तरावर समायोजन होऊ शकणार नाही त्यांना विभागस्तरावर Forward करण्यात येईल. अतिरिक्त शिक्षकांना कार्यमुक्त केल्यानंतर जुन्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी Online Relieve Report तसेच नवीन शाळेच्या मुख्याध्यापकांनी रुजू करुन घेतल्यावर Online Joining Report समायोजन पोर्टलवर भरणे आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व प्रक्रीया प्राथमिक शाळांबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेशी समन्वय साधून करावयाचे आहे तसेच माध्यमिक शाळांबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेशी समन्वय साधून करावयाचे आहे

वरील, पध्दतीने अनुदानित पदावरील अतिरिक्त शिक्षकांच्या ऑनलाईन समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्व जिल्हयांसाठीचे सर्वसाधारण वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील.

| ऑनलाईन समायोजन प्रक्रिया २०१६-१७ वेळापत्रक | | |
|---|---|---|
| अ.क्र. | प्रक्रीया | दिनांक |
| १ | संस्थेने वरील सर्व सर्व बाबींची पूर्तता करुन संस्थेतील शिक्षक संवर्गाची दि.०१.०१.२०१७ रोजीची सेवाज्येष्ठता यादी अंतिम करुन अतिरिक्त शिक्षक निश्चित करणे, शाळांतर्गत / संस्थांतर्गत समायोजन करणे | ५.४.२०१७ ते १०.४.२०१७ |
| २ | संस्थेकडील अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषय निहाय रिक्त पदे इ. बाबीसाठी शिबिरामध्ये शिक्षणाधिकारी यांनी मान्यता देणे, तसेच काही तक्रारी असल्यास संबंधितांचे निवेदन घेणे | १०.४.२०१७ ते २२.४.२०१७ |

| अ.क्र. | प्रक्रीया | दिनांक |
|---|---|---|
| ६ | अतिरिक्त शिक्षक, आरक्षण व विषयनिहाय रिक्त पदांची अंतिम सूची झाल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर शिक्षणाधिकारी यांनी माहिती भरणे | २९.४.२०१७ ते ३.५.२०१७ पर्यंत |
| ७ | शिक्षणाधिकारी यांनी जिल्हयाची अतिरिक्त शिक्षकांची सेवाजेष्ठता यादी, संस्थानिहाय आरक्षण, विषयनिहाय रिक्त पदांची माहिती प्रसिध्द करणे व संस्था लॉगिनला उपलब्ध करणे | ४.५.२०१७ ते ६.५.२०१७ पर्यंत |
| ८ | जिल्हास्तरावरील ऑनलाईन समायाजेनाची प्रक्रिया-टप्पा-१<br>संस्था लॉगिनव्दारे - संस्थेच्या पसंतीने निवड | ८.५.२०१७ ते १३.५.२०१७ |
| ९ | जिल्हास्तरावरील ऑनलाईन समायाजेनाची प्रक्रिया-टप्पा-२<br>(Round 1 to 6) | १५.५.२०१७ ते २०.५.२०१७ |
| १० | अतिरिक्त शिक्षकांना समायोजित शाळेत रुजू होण्यासाठी जुन्या शाळेतून कार्यमुक्त करणे, त्याचबरोबर त्याची Relieve Form मध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन नोंद करणे. | १६.५.२०१७ ते २२.५.२०१७ |
| ११ | अतिरिक्त शिक्षकांना समायोजित शाळेत रुजू करुन घेणे, त्याचबरोबर त्याची Joining Form मध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन नोंद करणे. | १७.५.२०१७ ते ३१.५.२०१७ |

वरीलप्रमाणे सर्व कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन होईल व दिलेल्या वेळापत्रकानुसार अतिरिक्त शिक्षकांच्या ऑनलाईन समायोजनाची प्रक्रिया पूर्ण होईल यासाठी संबंधित शिक्षणाधिकारी यांनी नियोजन करावे व सदरची प्रक्रिया पूर्ण करावी. सदर परिपत्रकास संदर्भ क्र.१४ च्या शासन पत्राने मान्यता दिलेली आहे.

**धीरज कुमार (भा.प्र.से.)**
आयुक्त शिक्षण, म.राज्य, पुणे
३/३/१७.

**प्रति,**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद (सर्व)
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)
४. शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम) बृहन्मुंबई

**प्रत,**

१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, म.शासन, मंत्रालय यांना माहितीस्तव सादर